बीड ●शुक्रवार, दिनांक २३ जानेवारी २०२६ ● वर्ष २० वे ● पाने ४ http://epaper.beedvastav.com https://www.beedvastav.com Email: beedvatsav@gmail.com ●किंमत ३ रुपये

स्क्रीन रिडरचा बादशहा

सांज दैनिक बीड RNI: Regd.No.MAH/MAR/2010/43846

# वास्तव

भारतरत्न रतनजी टाटा यांच्या महान देशभक्तीला समर्पित

२० वर्षे

एडिटर इन चिफ- जितेंद्र सिरसाट

ई पेपर वाचा

http://epaper.beedvastav.com

https://www.beedvastav.com

**‘वास्तव’ चा दणका**

# बीड जिल्हा परिषदमधील अतिरिक्त कामकाजच्या गोंडस नावाखाली बसलेल्या 150 प्रतिनियुक्त्या दणक्यात रद्द!!

## प्रजासत्ताकदिनी आंदोलनाच्या इशाऱ्याची झोपेचे सोंग घेतलेल्या जिल्हा परिषदेने घेतली दखल

**बीड : प्रतिनिधी**

**बीड जिल्हा परिषदेच्या शिक्षण, बांधकाम व आरोग्य विभागात सुरू असलेल्या मनमानी कारभारावर अखेर जिल्हा परिषद प्रशासनाला जाग आली असून, “अतिरिक्त कामकाज” या गोंडस नावाखाली करण्यात आलेल्या तब्बल १५० हून अधिक प्रतिनियुक्त्या रद्द करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. प्रजासत्ताकदिनी ध्वजारोहनासाठी येणाऱ्या पालकमंत्र्यांसमोर लक्षवेधी आंदोलनाचा इशारा सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख, बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ (महाराष्ट्र राज्य) डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांनी दिल्यानंतर, प्रशासनाने प्रजासत्ताक दिनाच्या आधीच याची दखल घेतली. दि. २२ जानेवारी रोजी प्रदीप काकडे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन), जिल्हा परिषद बीड यांनी सर्व विभागप्रमुखांना लेखी आदेश देत अतिरिक्त पदभार तात्काळ कमी करून संबंधित कर्मचाऱ्यांना त्यांच्या मूळ पदस्थापनेच्या ठिकाणी पूर्णवेळ रुजू करून घ्यावे, असे स्पष्ट निर्देश दिले आहेत.**




### ➤ आदेश न पाळल्यास जबाबदारी निश्चित

●या संदर्भात जिल्हाधिकारी, विभागीय आयुक्त आणि सामान्य प्रशासन विभागाकडे वारंवार तक्रारी प्राप्त झाल्याचे नमूद करत, दि. २३ जानेवारीपासून संबंधित कर्मचाऱ्यांना मूळ पदस्थापनेवर कार्यमुक्त न केल्यास विभागप्रमुख व सहाय्यक, कनिष्ठ प्रशासन अधिकारी यांना वैयक्तिक जबाबदार धरले जाईल, असा स्पष्ट इशारा देण्यात आला आहे.

### ➤ मूळ पदस्थापनेवर रुजू होईपर्यंत वेतन रोखण्याची मागणी

● जोपर्यंत अतिरिक्त कामकाज पाहणारा कर्मचारी आपल्या मूळ पदस्थापनेवर रुजू होत नाही, तोपर्यंत संबंधित कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्ते अदा करू नयेत, या भूमिकेवर सामाजिक कार्यकर्ते डॉक्टर गणेश ढवळे लिंबागणेशकर ठाम असून त्यांनी अशी आग्रही मागणी केली आहे. दरम्यान मूळ पदस्थापनेवर रुजू होईपर्यंत वेतन रोखण्यात आले नाही, तर पुन्हा आंदोलन करण्याची वेळ येऊ नये असाही इशारा यावेळी डॉक्टर ढवळे यांनी दिला आहे.

### ➤ सीईओ यांच्या चांगुलपणाचा गैरफायदा

● काही अधिकारी सीईओ यांच्या चांगुलपणाचा गैरफायदा घेत आहेत, असा आरोप केला जात असून या आरोपांमध्ये तथ्य असल्याचे देखील निष्पन्न होत आहे. दरम्यान १५० पेक्षा अधिक कर्मचारी महत्वाच्या टेबलांवर अतिरिक्त कामकाजाच्या नावाखाली ठाण मांडून बसले आहेत. यामागे अर्थपूर्ण हितसंबंध व सत्ताधारी गटांचा हात असण्याची दाट शक्यता नाकारता येत नाही. एकूणच सीईओ यांच्या चांगुलपणाचा गैरफायदा काही अंतर्गत हस्तक्षेप करणारी मंडळी घेत असल्याचे मत डॉ. ढवळे यांनी स्पष्ट केले आहे.

### नियमांचा बेकायदेशीर भंग! डॉ. ढवळे यांनी दिलेल्या निवेदनात काय म्हंटले!!

“जिल्हा परिषदेतील कोणत्याही कर्मचाऱ्याची प्रतिनियुक्ती करण्यासाठी विभागीय आयुक्तांची परवानगी आवश्यक असते. मात्र ‘प्रतिनियुक्ती’ हा शब्द टाळून ‘अतिरिक्त कामकाज’च्या नावाखाली नियमांचा सर्रास भंग करण्यात आला. विशेषत: शिक्षण, बांधकाम व आरोग्य विभागात अनेक कर्मचारी वर्षानुवर्षे एकाच ठिकाणी कार्यरत असून, काही विभागप्रमुख सामान्य प्रशासन विभागाला डावलून थेट सीईओ यांच्या नावावर फाईल पाठवत असल्याचा गंभीर आरोपही करण्यात आला आहे.



---

## पैनगंगा नदी पात्रातील टाकळी पेंडावर भरला वाळू चोरणाऱ्या ट्रॅक्टरांचा मेळावा


### ➤चोले पेंड पाठोपाठ टाकळी पेंढावरून वाळू चोरी जोरात सुरू

**सहाय्यक जिल्हाधिकारी जेनीत चंद्रा दोन्तूला शासकीय कामात व्यस्त असल्याचा घेत आहेत वाळू तस्कर फायदा**

**➤ माहूर : जावेद शेख**

माहूर तालुक्यातील तालुक्यातून गेलेल्या पैनगंगा नदी पात्रावरील विविध वाळू घाटावरून मोठ्या प्रमाणात वाळू तस्करी सुरू असून या तस्करीचे व्हिडिओ व्हायरल होऊनही जबर कारवाया होत नसल्याने वाळू तस्करांची हिंमत वाढून चोले पेंड पाठोपाठ आता गाजलेल्या टाकळी पेंडावरूनही वाळू चोरी सुरू झाल्याचे व्हिडिओ व्हायरल झाल्याने महसूल व पोलीस विभागाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उभे राहत आहेत

● पान २ वर...




## २४ जानेवारीपासून वडवणीत रंगणार भव्य ‘वडवणी कीर्तन महोत्सव

### ➤ ज्ञानेश्वरी प्रवक्ते ह.भ.प. अर्जुन महाराज खाडे यांचे आयोजन

**➤ वडवणी : अशोक फपाळ**

महाराष्ट्रातील नामांकित ज्ञानेश्वरी प्रवक्ते ह.भ.प. अर्जुन महाराज खाडे यांच्या मार्गदर्शनाखाली वडवणी शहरात सुरु असलेल्या वडवणी कीर्तन महोत्सवाचे यंदाचे तेरावे वर्ष आहे. या निमित्ताने वडवणी शहरातील मोठा मारोती मंदिराच्या पाठीमागे, लोकनेते स्व. गोपीनाथराव मुंडे चौक येथील मैदानात भव्य अशा वडवणी कीर्तन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.



या महोत्सवाचा प्रारंभ शनिवार, दि. २४ जानेवारी २०२६ रोजी होणार असून सांगता रविवार, दि. १ फेब्रुवारी २०२६ रोजी होणार आहे. वडवणी व पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी या अध्यात्मिक पर्वणीचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

ज्ञानेश्वरीच्या भावार्थाचे रसाळ व प्रभावी निरूपण करणारे ह.भ.प. अर्जुन महाराज खाडे यांनी वडवणीत सुरू केलेल्या या कीर्तन महोत्सवाने मागील बारा वर्षांत मोठी लोकप्रियता मिळवली आहे. प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी विविध नामांकित किर्तनकारांच्या उपस्थितीत महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

● पान २ वर...

## शास्त्रीय गायन विशारद परीक्षेत श्रेया ठोंगे प्रथम श्रेणीत उत्तीर्ण

**➤ माजलगाव / प्रतिनिधी :**

येथील श्री सिद्धेश्वर माध्यमिक विद्यालयातील माजी पर्यवेक्षक नारायण ठोंगे यांची नात श्रेया संग्राम ठोंगे हिने शास्त्रीय गायन विषयातील विशारद पूर्ण परीक्षेत प्रथम श्रेणी प्राप्त करून उल्लेखनीय यश संपादन केले आहे.



श्रेया हिचे सांगितिक शिक्षण नादमयी प्राणेश पोरे कुलकर्णी यांच्याकडे सुरू असून त्यांना गुरुजींचे सातत्यपूर्ण मार्गदर्शन लाभले आहे. गुरुजींच्या मार्गदर्शनामुळेच हे यश मिळाल्याचे श्रेयाने नमूद केले असून, तिने आपल्या गुरुजनांचे व कुटुंबाचे नाव अभिमानाने उज्ज्वल केले आहे. या यशामुळे माजलगावकरांचाही अभिमान वाढला आहे.

श्रेया हिने आपले प्राथमिक व माध्यमिक शिक्षण श्री सिद्धेश्वर माध्यमिक विद्यालयात पूर्ण केले असून सध्या तिचे पुढील पॉलिटेक्निक शिक्षण इगलवूड महाविद्यालयात सुरू आहे.

शास्त्रीय गायनाची ही परीक्षा श्री सिद्धेश्वर माध्यमिक विद्यालयाच्या केंद्रावर पार पडली. या केंद्रावर प्रारंभिक ते मध्यमा पूर्ण या परीक्षेसाठी एकूण ३० विद्यार्थी, तर विशारद प्रथम व विशारद पूर्ण या परीक्षेसाठी १४ विद्यार्थी परीक्षेला बसले होते. या यशाबद्दल श्री सिद्धेश्वर माध्यमिक विद्यालयाचे अध्यक्ष सुरेंद्र रेदासनी, कार्यवाह विश्वास जोशी, माध्यमिक विभागाचे अध्यक्ष प्रशांत भानप, पालक प्रतिनिधी प्रकाश दुगड, केंद्रप्रमुख मुख्याध्यापक संतोष लिंबकर, उपमुख्याध्यापक विवेक जोशी तसेच संगीत अध्यापक चैतन्य आहेर व कुणाल कुलकर्णी यांनी श्रेयाचे अभिनंदन करून तिच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

## लासूर स्टेशन जि.प. व पं. स.ची निवडणूक चूरशीची होणार

**➤ गंगापूर तालुका : गुलाब वाघ**

गंगापूर तालुक्यातील लासूर स्टेशन अर्थात हर्सूल/सावंगी जिल्हा परिषद गटाची निवडणूक अंत्यत चूरशीची होणार असून जिल्हापरिषद गटासाठी 12 उमेदवारांनी तर सावंगी पंचायत समिती गणासाठी 9 व माळीवाडगाव गणातून 7 उमेदवारांनी उमेदवारी अर्ज दाखल केले आहे. दरम्यान आज उमेदवारी अर्जाची छाननी होणार असून 27 जानेवारीला चिन्ह वाटप होणार आहे



जिल्हा परिषदसाठी भाजपाकडून संगीता संदीप आमराव, पोर्णिमा प्रभू बागुल अपक्ष, लताबाई पगारे अपक्ष, अमृता भाऊसाहेब आमराव शिवसेना- उ. बा.ठा, सुरेखा शिवनाथ गायकवाड अपक्ष, पुष्पा प्रकाश परोडकर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, सुरेखा सुनिल दुशिंग अपक्ष, दिक्षा संदिप

**हर्सूल/सावंगी जिल्हा परिषदसाठी 12 तर सावंगी पंचायत समितीसाठी 9 व माळीवाडगाव पंचायत समिती गणासाठी 7 उमेदवारी अर्ज दाखल.**

गायकवाड वंचित बहुजन आघाडी, सुजाता बाबासाहेब वंजारे अपक्ष, शारदा शैलेंद्र गायकवाड, अपक्ष, कोमल प्रशांत बत्तीसे भारतीय राष्ट्रीय काँग्रेस आदींनी उमेदवारी अर्ज दाखल केले असून सावंगी पंचायत समितीसाठी सुनील पाखरे भाजप, अमोल सिरसाठ राट्रावादी काँग्रेस, सुरेश जाधव भाजप, अजित जाधव एम.आय.एम., संदीप गायकवाड वंचीत बहुजन पार्टी, भाऊसाहेब कीर्तिकर शिवसेना, सुरेखा गायकवाड अपक्ष, नागसेन बागुल काँग्रेस, कडू शेलार अपक्ष, तरं माळीवाडगाव गणातून छायाताई वाघचौरे राष्ट्रवादी कॉंग्रेस, कविता रवींद्र चव्हाण भाजपा,, लताबाई पवार काँग्रेस, सविता अरुण सोनवणे शिवसेना शिंदे, भारताबाई जंघाळे अपक्ष, निर्मला देशमुख अपक्ष,

● पान २ वर...

**सामाजिक कार्याच्या जोरावर सर्वसमावेशक पसंती**

**➤ मागासवर्गीय आरक्षणामुळे प्रमुख पक्षांची जोरदार चाचपणी**

## तालखेड जि.प. सर्कलमध्ये भाजपकडून नानासाहेब घोडके आघाडीवर

**➤ अरविंद ओव्हाळ : माजलगाव**

जिल्हा परिषद निवडणुकीच्या पहिल्या टप्प्याची रणधुमाळी सुरू असतानाच, दुसऱ्या टप्प्यातील उमेदवारांच्या चाचपणीला प्रमुख पक्षांनी वेग दिला आहे. बीड जिल्ह्यातील जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुका दुसऱ्या टप्प्यात होणार असून, त्या पार्श्वभूमीवर माजलगाव तालुक्यातील अत्यंत महत्त्वाचा मानला जाणारा तालखेड जिल्हा परिषद सर्कल सध्या राजकीय चर्चेचा केंद्रबिंदू ठरला आहे.

तालखेड जि.प. सर्कल हे मागासवर्गीय उमेदवारासाठी आरक्षित असल्याने, येथे सर्वच प्रमुख पक्षांकडून इच्छुकांची चाचपणी सुरू आहे. या सर्कलमधून भारतीय जनता पक्षाकडून नानासाहेब घोडके यांचे नाव आघाडीवर असून, त्यांच्या प्रदीर्घ सामाजिक कार्यामुळे त्यांना संपूर्ण सर्कलमधून प्रथम पसंती मिळत असल्याचे चित्र आहे. विशेष म्हणजे, यावेळी जिल्हा परिषद अध्यक्ष पद हे मागासवर्गीय महिला उमेदवारांसाठी आरक्षित असल्याने तालखेड सर्कलचे राजकीय महत्त्व आणखी वाढले आहे.

### नानासाहेब घोडके : सामाजिक चळवळीतील अनुभवी नेतृत्व :

- **नाव** : नानासाहेब राधाकिसन घोडके
- **पत्ता** : रा. खानापूर, ता. माजलगाव, जि. बीड
- **जन्मदिनांक** : २० मार्च १९६३
- **जात** : चांभार
- **शिक्षण** : १२ वी
- **पद** : राष्ट्रीय चर्मकार महासंघ – बीड जिल्हाध्यक्ष
- नानासाहेब घोडके हे गेल्या १९९५ पासून सामाजिक कार्यात सक्रिय असून, राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे संस्थापक अध्यक्ष तथा माजी समाजकल्याण मंत्री बबनराव घोलप यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी संघटनात्मक कामाची मुहूर्तमेढ रोवली.



●भाजपप्रती निष्ठा व सातत्यपूर्ण संघटनात्मक काम ●आजपर्यंत नानासाहेब घोडके यांनी सातत्याने भाजपचे काम केले आहे. ● आदरणीय आर. टी. जिजा देशमुख यांच्यासोबत संघटनेच्या माध्यमातून विधानसभा निवडणुकीचे काम ●मा. डॉ. प्रीतमताई मुंडे यांना केज लोकसभा मतदारसंघात संघटनेतर्फे जाहीर पाठिंबा ●मा. रमेशजी आडसकर यांच्या विधानसभा उमेदवारीसाठी ताकदीने प्रचार ● अलीकडील लोकसभा निवडणुकीत पंकजाताई मुंडे यांना माजलगाव येथे भव्य मेळाव्याच्या माध्यमातून पाठिंबा देत ११ तालुक्यांत प्रचार ● याशिवाय, नुकत्याच झालेल्या नगरपालिका निवडणुकांमध्ये बीड व माजलगाव येथे बैठका घेऊन भाजपचा प्रचार पूर्ण ताकदीने केला.

### ➤ ठळक सामाजिक उपक्रम

● वयोवृद्धांना संजय गांधी निराधार योजना लाभ मिळवून देण्यासाठी मदत ●अत्याचारग्रस्त, पीडित व आपत्तीग्रस्तांना तत्काळ मदतकार्य ●विधवा, मतीमंद व अपंगांसाठी मार्गदर्शन शिबिरे व सहाय्य ●महापुरुषांच्या जयंती व सामाजिक प्रबोधन उपक्रम ●न्याय व हक्कासाठी मोर्चे, उपोषण व सामाजिक चळवळी ● कोरोना काळात अन्नधान्य किट वाटप ●लोकांच्या सुख-दु:खात नेहमी सहभागी असणारे, चारित्र्यसंपन्न कार्यकर्ता म्हणून त्यांची ओळख आहे.

**सन्मान व पुरस्कार :**

●२०१९ – संत रविदास समाजभूषण पुरस्कार (सामाजिक न्याय विभाग, मुंबई) ●२०२४ – डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार ● विविध सामाजिक संस्थांकडून अनेक पुरस्कारांनी गौरव

**राजकीय विश्लेषकांचे मत :**

●सततच्या सामाजिक कार्यामुळे नानासाहेब घोडके यांना अठरा पगड जाती-धर्मातील नागरिकांचा मोठा पाठिंबा मिळत आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली तालखेड जिल्हा परिषद तसेच सावरगाव व तालखेड पंचायत समितीच्या निवडणुका भाजपसाठी सोप्या ठरू शकतात, असे मत राजकीय विश्लेषक व्यक्त करत आहेत.

## आजचे राशि भविष्य

### मेष रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस गोंधळात टाकणारा असेल. तुम्हाला विनाकारण खूप धावपळ करावी लागेल, ज्यामुळे तुमचे मन अस्वस्थ होईल. काही काम पूर्ण न झाल्यामुळे तुम्ही निराश व्हाल, परंतु तुम्हाला तुमच्या बोलण्यात आणि वागण्यात संयम ठेवावा लागेल, अन्यथा समस्या उद्‌भवू शकते. जर तुमच्या मालमत्तेशी संबंधित कोणताही खटला न्यायालयात सुरू असेल तर आजचा या प्रकरणात तुमच्या बाजूने निकाल लागेल. तुम्ही तुमच्या विरोधकांवर विजय मिळवाल. राजकारणात काम करणाऱ्या लोकांना मोठे पद आणि आदर मिळू शकतो. जर कुटुंबात परस्पर मतभेद असतील तर ते सोडवले जाऊ शकतात.

### वृषभ रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस आरोग्याच्या दृष्टीने कमकुवत राहणार आहे, म्हणून तुम्हाला तुमच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करणे टाळावे लागेल. तुम्ही नवीन व्यवसाय सुरू करू शकता, परंतु आजचा भागीदारीच्या कामात अडचणी येण्याची शक्यता आहे, म्हणून आजचापासून भागीदारीचे काम सुरू करू नका. तुमचे मन एखाद्या गोष्टीबद्दल चिंतेत असेल. सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांनी काही मोठ्या फसवणुकीपासून सावध राहण्याची गरज आहे. तुम्हाला भूतकाळातील काही चुकांमधून धडा घ्यावा लागेल आणि तुमच्या भावनांवर नियंत्रण ठेवावे लागेल. कामाच्या संदर्भात तुमचा प्रवास आजचा यशस्वी होईल.

### मिथुन रास

➤ या राशीसाठी आजचा दिवस खूप शुभ राहणार आहे. तुम्हाला नवीन वाहन मिळू शकते. तुम्ही तुमच्या कुटुंबातील सदस्यांसह कोणत्याही शुभ समारंभात सहभागी होऊ शकता. मुलांशी तुमचा चांगला समन्वय असेल आणि तुम्ही त्यांच्या शिक्षणात त्यांना पाठिंबा द्याल. तुमच्यासाठी नवीन कामात गुंतवणूक करणे चांगले राहील. तुमच्या मनात असलेल्या समस्यांबद्दल तुम्ही वरिष्ठ सदस्यांशी बोलू शकता आणि त्यांच्याकडून तुम्हाला योग्य उपाय मिळतील. आईचा कोणताही जुना आजार पुन्हा उद्‌भवू शकतो ज्यामुळे त्रास होईल. सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांनी काही मोठ्या फसवणुकीपासून सावध राहण्याची गरज आहे.

### कर्क रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस कायदेशीर बाबींमध्ये चांगला राहणार आहे. तुम्हाला उत्पन्नाचे नवीन स्रोत मिळतील. कुटुंबातील लोक तुमच्या शब्दांचा आदर करतील, ज्यामुळे तुम्ही समाधानी राहाल आणि काहीतरी खास करण्याची इच्छा प्रबळ राहील. आजचा तुम्ही तुमच्या कुटुंबाच्या आनंदासाठी काही भौतिक वस्तू खरेदी करू शकता. कोणत्याही अनोळखी व्यक्तीच्या प्रभावात येऊ नका, अन्यथा तो तुम्हाला फसवू शकतो. तुम्हाला भूतकाळातील काही चुकांमधून धडा घ्यावा लागेल आणि तुमच्या भावनांवर नियंत्रण ठेवावे लागेल. कामाच्या संदर्भात तुमचा प्रवास आजचा यशस्वी होईल.

### सिंह रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस अचानक लाभदायक असेल. पण आजचा गाडी चालवताना त्यांना काळजी घ्यावी लागेल कारण दुखापत आणि अपघात होण्याची शक्यता आहे. व्यवसायात कोणासोबतही भागीदारीत कोणताही करार करू नका, अन्यथा तुमची फसवणूक होऊ शकते, असा सल्ला दिला जातो. तुम्हाला एखाद्या गोष्टीची काळजी असेल. आजचा तुम्हाला तुमच्या बोलण्यावर नियंत्रण ठेवावे लागेल, अन्यथा तुमचा प्रियकर एखाद्या गोष्टीने नाराज होऊ शकतो. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते. मुलांच्या लग्नातील अडथळे दूर होतील.

### कन्या रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस तुमच्यासाठी थोडा गोंधळात टाकणारा असेल. मानसिक अस्वस्थतेमुळे तुम्हाला निर्णय घेण्यात अडचण येईल. परस्पर भांडणांमुळे कुटुंबातील वातावरण बिघडू शकते. तुमच्या मनात एखाद्या गोष्टीची भीती असेल, ज्यामुळे तुम्ही चिंतेत राहाल. आजचा एखाद्या स्पर्धेत यश मिळाल्याने विद्यार्थ्यांना आनंद होईल. नोकरी करणाऱ्या लोकांवर कामाचा ताण जास्त असेल, परंतु तरीही वरिष्ठांच्या मदतीने ते वेळेवर काम पूर्ण करतील. वैवाहिक जीवन तुमच्या जोडीदाराची तब्येत ठीक नसेल तर आजचा ती सुधारेल.

### तूळ रास

➤ आजचा, तूळ राशीसाठी फायदेशीर राहील आणि आदर वाढेल. तुम्हाला वाहनाचे सुख मिळेल, जे लोक वाहन खरेदी करण्याचा विचार करत आहेत त्यांच्यासाठी आजचा दिवस या बाबतीत अनुकूल असेल. कुटुंबातील एखाद्या सदस्याला तुम्ही बोललेल्या गोष्टीबद्दल वाईट वाटू शकते, ज्यामुळे तो रागावू शकतो. तुमच्या अभ्यासाशी संबंधित काही प्रकरणे सोडवली जात आहेत असे दिसते. खूप दिवसांनी जुना मित्र भेटून तुम्हाला आनंद होईल. कुटुंबातील सदस्यांकडून अपेक्षित सहकार्य मिळू शकेल. एखादा जुना मित्र खूप दिवसांनी तुम्हाला भेटायला येऊ शकतो.

### वृश्चिक रास

➤ आजचा तुमच्यासाठी प्रगतीचा मार्ग मोकळा करेल. व्यवसायात नफा मिळाल्यानंतर तुम्ही आनंदी व्हाल. एखाद्याकडून ऐकलेल्या गोष्टीवरून वाद घालू नका, अन्यथा तुमचे नुकसान होऊ शकते. पैशाशी संबंधित कोणताही विषय तुम्हाला त्रास देऊ शकतो. आर्थिक बाबींमध्ये तुम्ही मित्रांकडून सल्ला घेऊ शकता परंतु इतर कोणाच्याही प्रभावाखाली कोणताही निर्णय घेऊ नका अन्यथा तुमचे नुकसान होऊ शकते. विद्यार्थ्यांसाठी उच्च शिक्षणाचा मार्ग मोकळा होईल. विद्यार्थ्यांना शिक्षणात येणाऱ्या समस्यांबद्दल त्यांच्या शिक्षकांशी बोलावे लागू शकते. ज्येष्ठांचे मार्गदर्शन तुमच्यासाठी फायदेशीर ठरेल.

### धनु रास

➤ आजचा दिवस तुमच्यासाठी सामान्य असेल. तुम्हाला तुमच्या विरोधकांपासून सावध राहावे लागेल. अनावश्यक अडचणीत पडणे टाळावे आणि स्वत:च्या कामात लक्ष द्यावे. जर तुम्ही दुसऱ्यांच्या बाबतीत ढवळाढवळ केली तर तुम्ही अडचणीत येऊ शकता. जर तुमच्या तब्येतीत काही बिघाड झाला असेल तर आजचा ती सुधारेल. कुटुंबातील सदस्यांकडून अपेक्षित सहकार्य मिळू शकेल. एखादा जुना मित्र खूप दिवसांनी तुम्हाला भेटायला येऊ शकतो. खूप दिवसांनी जुना मित्र भेटून तुम्हाला आनंद होईल. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते. मुलांच्या लग्नातील अडथळे दूर होतील.

### मकर रास

➤ या दिवस तुमच्यासाठी गोंधळात टाकणारा असू शकतो. तुमचे मन एखाद्या गोष्टीबद्दल चिंतेत असेल. कुटुंबातील एखाद्या सदस्याकडून तुम्हाला काही चांगली बातमी ऐकायला मिळू शकते. आजचा तुम्ही तुमच्या कामाच्या व्यवसायात काही बदल कराल परंतु आजचा कोणतेही धोकादायक पाऊल उचलू नका. आजचा तुम्हाला तुमच्या बोलण्यावर नियंत्रण ठेवावे लागेल, अन्यथा तुमचा प्रियकर एखाद्या गोष्टीने नाराज होऊ शकतो. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते. मुलांच्या लग्नातील अडथळे दूर होतील.

### कुंभ रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस चांगला राहणार आहे. व्यवसायात, तुम्हाला मागील योजनांमधून चांगले फायदे मिळू शकतात, ज्यामुळे तुम्हाला आनंद होईल. जर तुमचे कोणतेही प्रलंबित काम तुम्हाला बऱ्याच काळापासून त्रास देत असेल तर तेही पूर्ण होऊ शकते. जर तुम्हाला कोणत्याही शारीरिक समस्येमुळे त्रास झाला असेल तर तुम्हाला त्यातही आराम मिळत असल्याचे दिसून येते. विद्यार्थ्यांना शिक्षणात येणाऱ्या समस्यांबद्दल त्यांच्या शिक्षकांशी बोलावे लागू शकते. ज्येष्ठांचे मार्गदर्शन तुमच्यासाठी फायदेशीर ठरेल. पैशाशी संबंधित कोणताही विषय तुम्हाला त्रास देऊ शकतो.

### मीन रास

या राशीसाठी आजचा दिवस चैनीच्या वस्तूंमध्ये वाढ आणणारा आहे. तुम्ही तुमच्या आयुष्यात एक मोठा निर्णय घेऊ शकता आणि वरिष्ठ सदस्य तुमच्या बोलण्याने खूश होतील. तुमच्या जोडीदाराकडून तुम्हाला भेटवस्तू मिळू शकते. तुमच्या पालकांच्या आशीर्वादाने तुम्ही आजचा यशाकडे वाटचाल कराल. आजचा व्यवसायात तुमची कमाई चांगली असेल. नोकरी करणाऱ्या लोकांवर कामाचा ताण जास्त असेल, परंतु तरीही वरिष्ठांच्या मदतीने ते वेळेवर काम पूर्ण करतील. वैवाहिक जीवन तुमच्या जोडीदाराची तब्येत ठीक नसेल तर आजचा ती सुधारेल. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते.

# मधुमेह असेल तर चुकूनही 'हे' पदार्थ खाऊ नका, रक्तातील साखर वाढणारच नाही

भारतात मधुमेहींची संख्या दिवसेंदिवस वाढत असल्याचे दिसून येत आहे. याला अनेक घटक कारणीभूत असले तरी मधुमेह झाल्यानंतही रुग्णांकडून या आजाराला अगदी सामान्य असल्यातची वागणूक दिली जाते. जे भविष्यात मधुमेह रुग्णांच्या आरोग्यासाठी सर्वात धोकादायक ठरु शकते. मधुमेहाच्या बाबतीत शरीरातील रक्तातील साखरेचे प्रमाण नियंत्रणात ठेवणे अत्यंत आवश्यक आहे.

अशा परिस्थितीत रुग्ण संतुलित आहार घेऊन रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित करू शकतो. मधुमेहाचे दोन प्रकार आहेत एकतर टाइप 1 मधुमेह आणि टाइप 2 मधुमेह टाइप 1 मधुमेह कोणत्याही वयात होऊ शकतो. जर तुम्हाला मधुमेह नियंत्रणात ठेवायचा असेल तर खाण्याच्या सवयींवर लक्ष देणे गरजेचे आहे. मधुमेहावर कोणताही निश्चित इलाज नसला तरी आणि खाण्यापिण्याची काळजी घेतली नाही तर तुमची प्रकृती गंभीर होण्यापासून वाचवू शकत नाही.

## रिफाइंड पीठ

रिफाइंड केलेले पीठ, जसे की मैदा, गव्हाचे पॅक पीठ यामुळे मधुमेहाचा धोका वाढण्याची शक्यता असते. व्हाईट ब्रेड, पास्ता, तांदूळ इत्यादींमध्ये कार्बोहायड्रेटचे प्रमाण अधिक असते आणि फायबरचे प्रमाण खूपच कमी असते. मधुमेहाच्या रुग्णांनी अशा पदार्थांचे सेवन टाळावे. पांढ-या रंगाचे पदार्थ जास्त स्टार्चयुक्त असतात त्यामुळे रक्तातील साखर अचानक वाढू शकते.



## बटाटे

बटाट्यात सर्वात जास्त स्टार्चचा साठा आणि कार्बोहायड्रेटचे प्रमाण अधिक असते. त्यामुळे रक्तातील साखरेची पातळी वाढू शकते. बटाट्याचा ग्लायसेमिक इंडेक्स 111 आहे, ज्यामुळे रक्तातील साखरेची पातळी अचानक वेगाने वाढू शकते. आपल्यापैकी अनेकांना बटाटे खायला आवडतात, पण अशा परिस्थितीत एक सोपा उपाय म्हणजे फक्त बटाटे खाऊ नका. भाजीतील बटाटा खाऊ शकता, पण बटाट्याची भजी, फ्रेंच फ्राईज, चिप्स खाल्ल्याने रक्तातील साखर वाढू शकते.

## मांसाहारी

मधुमेही रुग्णांनी मांसाहार म्हणून लाल मांस, सॅलम टाळावे. हे पदार्थ मधुमेहींसाठी अक्षरश: विषासारखे काम करू शकतात. आहारातील सॅच्युरेटेड फॅटस हे रक्तातील साखर वाढवण्याचे कारण आहे. जर तुम्हाला मधुमेहाचा त्रास असेल तर महिन्यातून एकदाच चिकन आणि मटण खाण्यास हरकत नाही.

## सोडा पेय

मधुमेहाच्या रुग्णांना गोडाचे सेवन टाळण्याचा सल्ला दिला जातो. यामध्ये कृत्रिम फळांचा ज्यूस, आइस टी, सोडा यांचा समावेश अधिक प्रमाणात असतो. या सोडायुक्त पेयांमध्ये कार्बोहायड्रेटचे प्रमाण जास्त असते. त्यामुळे रक्तातील साखरेचे प्रमाण वाढते. ड्रिंक्समध्ये असलेल्या फ्रक्टोजमुळे शरीरात इन्सुलिनचा प्रभाव पडतो. तसेच वजन वाढते, फॅटी लिव्हरमुळे अपचनाचा त्रास होतो.

## मीठाचे कमी सेवन

मिठाच्या अतिसेवनामुळे केवळ रक्तातील साखरेचे प्रमाण वाढते असे नाही तर अनेक गंभीर समस्या, विशेषत: हृदयाशी संबंधित आजारांचा धोकाही वाढू शकतो. जर तुम्हाला उच्च रक्तदाबाचा त्रास असेल तर तुम्ही दररोज 2,300 मिलीग्रामपेक्षा कमी मीठ खावे.

# चेक घेताना किंवा देताना **या 5 चुका तुम्हाला पडतील महागात, जाऊ शकता तुरुंगात!**

तुम्हालाही चेकद्वारे व्यवहार करणे सोपे वाटत असेल, तर तुमच्यासाठी त्याच्याशी संबंधित काही नियम जाणून घेणे महत्त्वाचे आहे. काही वेळा नियमांकडे दुर्लक्ष करणे किंवा एखादी छोटीशी चूकही तुम्हाला महागात पडू शकते. एक छोटीशी चूक तुम्हाला 2 वर्षांपर्यंत तुरुंगात पाठवू शकते. चेकशी संबंधित नियम वेळोवेळी बदलत राहतात.


चेकद्वारे पेमेंट करताना एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे. चेकशी जोडलेल्या खात्यात पुरेशी रक्कम आहे. जर तुमच्या खात्यात चेकमध्ये लिहिलेली रक्कम नसेल, तर तो बाऊन्स होऊ शकतो आणि चेक बाऊन्स होणे ही अत्यंत धोकादायक परिस्थिती आहे.

चेकद्वारे व्यवहार करताना या गोष्टी लक्षात ठेवा.

### जर तुम्ही चेकद्वारे व्यवहार करत असाल तर तुम्ही या 5 गोष्टी लक्षात ठेवाव्यात.

तुम्ही तुमच्या चेकवर तपशील अचूक भरला पाहिजे. उदाहरणार्थ, आकृत्यांमध्ये रक्कम लिहिल्यानंतर, ती ( – ) चिन्हाने बंद करा आणि संपूर्ण रक्कम शब्दात लिहिल्यानंतर, फक्त लिहा. यामुळे तुमचा चेक फसवणूक होण्याची शक्यता कमी होते.

चेकचा प्रकार स्पष्टपणे नमूद करा. जसे की तो खातेदार धनादेश असो की बेअरर चेक. त्यावर कोणती तारीख लिहिली आहे? ही माहिती चेकवर स्पष्ट असावी.



एवढेच नाही तर धनादेशावर नीट सही करावी, जेणेकरून तो बाऊन्स होणार नाही. चेकवरील स्वाक्षरी बँकेच्या नोंदीशी जुळली पाहिजे. आवश्यक असल्यास, चेकच्या उलट बाजूस स्वाक्षरी लावावी, जेणेकरून बँक अधिकाऱ्याला जुळवणे सोपे होईल.

धनादेश अशा पेनने लिहावा की माहिती पुसली जाऊ शकत नाही. तुम्ही असे न केल्यास तुम्ही फसवणुकीला बळी पडू शकता. सर्वात महत्त्वाची गोष्ट अशी आहे की तुम्ही केवळ प्रिंटेड धनादेश स्वीकारत आहात.

चेक जारी करण्यापूर्वी, तुमच्या खात्यात पुरेशी शिल्लक असल्याची खात्री करा. असे न झाल्यास, तुमचा चेक बाऊन्स होईल आणि चेक बाऊन्स झाल्यास तुम्हाला दंड होऊ शकतो. याव्यतिरिक्त, तुम्हाला 2 वर्षांपर्यंत तुरुंगवास देखील होऊ शकतो.

नुकतेच 'घायल' आणि 'दामिनी' सारखे दमदार चित्रपट बनवणारे प्रसिद्ध दिग्दर्शक राजकुमार संतोषी यांना जामनगर कोर्टाने चेक बाऊन्स प्रकरणी 2 वर्षांची शिक्षा सुनावली आहे. राजकुमार संतोषी यांनी जामनगर येथील उद्योगपती अशोक लाल यांना दिलेले एकामागून एक 10 धनादेश बाऊन्स झाले. हे प्रत्येकी 10 लाख रुपयांचे 10 धनादेश होते आणि 1 कोटी रुपयांचे सर्व धनादेश बाऊन्स झाले होते. यानंतर न्यायालयीन कारवाई झाली आणि न्यायालयाच्या आदेशानुसार राजकुमार संतोषी यांना 2 वर्षांची शिक्षा सुनावण्यात आली आणि दुसऱ्या पक्षाला दुप्पट रक्कम म्हणजे सुमारे 2 कोटी रुपये देण्यास सांगण्यात आले.

# बल्ब किंवा ट्यूबलाइट फुटल्यावर का येतो 'भप्प' असा आवाज?

घर, ऑफिस आणि मॉल्समध्ये दिवे लावण्यासाठी तुम्ही बल्ब आणि ट्यूबलाइट्स लावलेले पाहिले असतील. अनेक वेळा घरातील बल्ब आणि ट्यूबलाइट बदलताना ते पडल्यामुळे फुटतात आणि त्यातून 'भप्प' असा आवाज येतो. तुम्ही या येणा-या आवाजाचा विचार केला आहे का? शेवटी, बल्ब किंवा ट्यूबलाइटचा स्फोट झाल्यावर असा आवाज का येतो? नसेल तर काही हरकत नाही, आम्ही तुम्हाला या भप्पच्या आवाजाचे रहस्य सर्व काही सांगणार आहोत. टंगस्टन मेटल फिलामेंटचा वापर बल्ब आणि ट्यूब लाइटमध्ये प्रकाश देण्यासाठी केला जातो. जेव्हा या फिलामेंटमधून वीज वाहते, तेव्हा ती उजळते आणि तुमच्या खोलीतील अंधार दूर करते. हीच गोष्ट बल्ब आणि ट्यूबलाइटचा स्फोट झाल्यावर होणाया आवाजाशी संबंधित आहे, ज्याबद्दल आम्ही तुम्हाला सविस्तर सांगत आहोत. बल्ब आणि ट्यूबलाइट्समध्ये फिलामेंटचा वापर सर्वात महत्वाचा आहे, त्याशिवाय आपण बल्ब आणि ट्यूबलाइटमधून प्रकाशाची कल्पना करू शकत नाही. ही दोन्ही उपकरणे बनवण्याचा प्रयत्न सुरू असताना फिलामेंटला पर्याय म्हणून अनेक धातूंचा वापर करण्यात आला, परंतु प्रत्येक वेळी हा प्रयोग अयशस्वी ठरला. शेवटी शास्त्रज्ञांना बल्ब आणि ट्यूबलाइटमध्ये प्रकाश देण्यासाठी टंगस्टन धातू सापडला. जे फिलामेंट बनवण्यासाठी सर्वोत्तम आहे. बल्ब आणि ट्यूबलाइटचा फिलामेंट टंगस्टन धातूपासून बनलेला असतो. ऑक्सिजनच्या उपस्थितीत ते वीज पार करून जाळले जाऊ शकत नाही. त्यामुळे जेव्हा ते बल्ब आणि ट्यूबलाइट्समध्ये वापरले जातात तेव्हा त्यातून ऑक्सिजन काढून टाकला जातो. त्याऐवजी दुसरा गॅस वापरला जातो. ज्याचा फिलामेंट जाळण्यात मोठा हातभार लागतो. जेव्हा बल्ब किंवा ट्यूबलाइटचा स्फोट होतो, तेव्हा वायू बाहेर पडतो आणि ऑक्सिजनमध्ये मिसळतो, तेव्हा फुसफुसणारा आवाज येतो. जेव्हा फिलामेंट बल्ब आणि ट्यूबलाइट्समध्ये ठेवले जाते तेव्हा ऑक्सिजन पूर्णपणे काढून टाकला जातो. त्याऐवजी हेलियम, निऑन, नायट्रोजन आणि क्रिप्टॉन या वायूंचा वापर केला जातो. या वायूंमुळे, फिलामेंटमधून वीज जात असताना ती जळत नाही आणि वर्षानुवर्षे प्रकाश देते. जेव्हा बल्ब आणि ट्यूबलाइटमधून वीज प्रवाहित होते, तेव्हा ते प्रकाश तयार करतात. या काळात उष्णता निर्माण होते आणि त्यामुळे बल्ब आणि ट्यूबलाइट आतून गरम होऊ लागतात. जर बल्ब आणि ट्यूबलाइट्समध्ये जाड काच वापरली गेली, तर ही उष्णता बाहेर पडू शकत नाही, ज्यामुळे बल्ब आणि ट्यूबलाइट आपोआप क्रॅक होतील आणि तुटतील. म्हणूनच बल्ब आणि ट्यूबलाइटमध्ये पातळ काच वापरली जाते, ज्यामुळे उष्णता सहज बाहेर पडते.



# आरपीआय (दलित) नेत्याच्या घरावर मध्यरात्री जमावाचा हल्ला; दगडफेक आणि मारहाणीत शिनगारे कुटुंब गंभीर जखमी

➤**बीड : अमोल जाधव.**

बीड तालुक्यातील नाथापूर येथे दोन गटांत झालेल्या वादाचे रूपांतर हिंसक घटनेत झाले असून, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (A) चे पिंपळनेर सर्कल प्रमुख सतीश शिनगारे यांच्या घरावर ५० ते ६० लोकांच्या जमावाने भीषण हल्ला केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या हल्ल्यात लहान मुलांसह कुटुंबातील सदस्यांना मारहाण करण्यात आली असून जातीवाचक शिवीगाळ केल्याचा आरोपही करण्यात येत आहे. **नेमकी घटना काय?** : मिळालेल्या माहितीनुसार, नाथापूर परिसरात दोन गटांत जुन्या वादातून तणाव निर्माण झाला होता. याचे पर्यावसान गुरुवारी हिंसक जमावात झाले. अंदाजे ५० ते ६० जणांच्या जमावाने सतीश शिनगारे यांच्या निवासस्थानाला लक्ष केले. जमावाने केवळ घराच्या दिशेने जोरदार दगडफेक केली नाही, तर घरात घुसून महिला आणि लहान मुलांनाही बेदम मारहाण केल्याचे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले. **जातीवाचक शिवीगाळ आणि दहशत :** हल्ला करताना जमावाकडून मोठ्या प्रमाणावर जातीयवादी घोषणाबाजी आणि अश्लील शिवीगाळ करण्यात आली. यामुळे परिसरात भीतीचे वातावरण पसरले असून दलित समाजात तीव्र संताप व्यक्त होत आहे. या घटनेचे काही व्हिडिओ सोशल मीडियावर तुफान व्हायरल झाले असून, त्यामध्ये जमावाचा आक्रमकपणा स्पष्टपणे दिसून येत आहे.





## २४ जानेवारीपासून वडवणीत रंगणार भव्य

●पान १ वरून...●**दैनंदिन कार्यक्रम**●**पहाटे ४ ते ६ :** काकडा आरती ●**सकाळी ७ ते ११ :** सामुदायिक ज्ञानेश्वरी पारायण●**रात्री ८ ते १० :** कीर्तन सेवा दररोज सकाळी होणाऱ्या ज्ञानेश्वरी पारायणाचे नेतृत्व किर्तनकार सौ. गीताताई खाडे-भांगे करणार असून, त्यांना गायनाचार्य संजय महाराज देवकर, रमेश महाराज गिन्हे, मुगुट महाराज धायगुडे, मृदंगाचार्य निलेश महाराज खेडकर व सचिन महाराज मुंडे यांची साथ लाभणार आहे.

●**कीर्तन सेवेचे नियोजन**●२४ जानेवारी, शनिवार – ह.भ.प. अशोक महाराज इलग शास्त्री (सौजन्य : बाबुराव बामनराव नागरगोजे)●२५ जानेवारी, रविवार – ह.भ.प. धर्मगुरु अमृताश्रम स्वामी (सौजन्य : समस्त ग्रामस्थ वडवणी)●२६ जानेवारी, सोमवार – ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज तांबे (सौजन्य : दत्तात्रय आयुचा चोले, दिलीप रघुनाथ मुंडे, पोपट पंढरीनाथ जाधव)●२७ जानेवारी, मंगळवार – ह.भ.प. समाधान महाराज भोजेकर (सौजन्य : उपनगराध्यक्ष बन्सीधर केशवराव मुंडे)

●२८ जानेवारी, बुधवार – ह.भ.प. पुरुषोत्तम महाराज पाटील (सौजन्य : नगरसेवक अरुण सुरेशराव मुंडे)●२९ जानेवारी, गुरुवार – ह.भ.प. दयानंद महाराज कोरेगांवकर (सौजन्य : वैद्यकीय तज्ञ डॉ. पारसमल पन्नालाल नहार)

●३० जानेवारी, शुक्रवार – ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज पठाडे (सौजन्य : दिलीप मनोहर मुळे)●३१ जानेवारी, शनिवार – ह.भ.प. भगवान महाराज राजपूत (मठाधिपती – सत्यवादी राजा हरिश्चंद्र संस्थान, सौजन्य : गोरख अण्णासाहेब मुंडे) काल्याचे कीर्तन व महाप्रसाद●दि. १ फेब्रुवारी २०२६, रविवार रोजी सकाळी १० ते १२ या वेळेत ह.भ.प. अर्जुन महाराज खाडे यांचे काल्याचे कीर्तन होणार असून, त्यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. हा महाप्रसाद स्व. हिरालाल पन्नालाल नहार व स्व. सुरजबाई हिरालाल नहार यांच्या पुण्यस्मरणार्थ वडवणी शहरातील प्रसिद्ध उद्योजक व प्रतिष्ठित व्यापारी माणिकचंद हिरालाल नहार यांच्या सौजन्याने होणार आहे. हा संपूर्ण कीर्तन महोत्सव वडवणी शहरातील मोठा मारोती मंदिराच्या पाठीमागील मैदानात पार पडणार असून, सर्व वडवणीकरांच्या तन-मन-धनाच्या सहकार्यातून हा उपक्रम यशस्वी होत आहे. या महोत्सवासाठी सर्व पत्रकार बांधवांचे विशेष सहकार्य लाभत असल्याचे आयोजकांनी नमूद केले आहे.

## लासूर स्टेशन जि.प. व पं. स.ची निवडणूक...

सुनीता आव्हाळे शिवसेना उबाठा, आदींनी उमेदवारी अर्ज दाखल केले असून 27 तारखेनंतर निवडणुकीचा धुराळा उडणार आहे.

**सावंगीला मुस्लिम "वोटिंग" ठरणार "किंगमेकर"..** दरम्यान सावंगी जिल्हा परिषद गटात मुस्लिम धार्मियांचे मतदान लक्षनीय आहे त्यामुळे सावंगी जिल्हा परिषद वं पंचायत समिती निवडणुकित मुस्लिम वोटिंग किंगमेकर ठरणार असून गेमचेंजर ठरणार आहे त्यामुळे सावंगी गट व गण यामध्ये निवडणुक चूरशीची होणार आहे यात शंकाच नाही.

## पैनगंगा नदी पात्रातील टाकळी पेंडावर..

पैनगंगा नदी पात्रावरील पाच वाळू घाट लिलाव झाले असून लिलावधारकाने शासनाचा कोट्यावधीचा लिलावात घपला केल्याने अद्याप घाटावरून अधिकृत वाळू विक्री सुरू केली नसल्याने नागरिकांना बांधकामासाठी वाळूची गरज पाहून वाळू तस्करांनी तोंड वर काढत प्रसिद्ध चोले पेंड टाकळी सायफळ दिगडी कुत्तेमार कुपटी परिसरातील दीडशेवर ट्रॅक्टर टिप्पर द्वारे वाळू चोरी करून नागरिकांना भरमसाठ किमती घेऊन विक्री केली जात आहे

महसूल व पोलीस विभागातील अंदरची कामे करणारे काही कर्मचारी तसेच मोठ मोठ्या पक्षाचे पदाधिकारी या वाळू तस्करीच्या धंद्यात लिप्त असल्याने मोठ्या अधिकाऱ्यांना सदरील चोरीचा पत्ता लागू देत नसल्याने अधिकारी हतबल दिसत असून अनेक वेळा ओरड होऊनही जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी माहूर तहसील कार्यालयाला आणखी एक वाहन अग्निशस्त्र उपलब्ध करून दिले नसल्याने वाळू तस्कर हल्ला करतील या भीतीने आता महसूल पोलीस विभागाचे अधिकारी कर्मचारी रात्रीला वाळू घाटावर जाण्यास धजावत नसल्याने रात्रभर मजुरासह बोट लावून वाळू तस्करी सुरू असून वाळू चोरी होत असल्याची माहिती मिळताच गेलेल्या कर्मचाऱ्यांना फक्त तराफेच हाती लागत असल्याने महाराष्ट्र शासनापेक्षा वाळू तस्करांचे हात भक्कम असल्याची प्रचिती प्रचंड प्रमाणात होत असलेल्या वाळू तस्करी वरून दिसत आहे अनेक गावात छाटछूट वाळू तस्कर ट्रॅक्टर द्वारे चोरी करीत असल्याने या चिल्लर ट्रॅक्टर धारकांना सापळा रचून पकडण्यात येते परंतु मौजे चोले पेंड आणि टाकळी येथून दिवस रात्र सुरू असलेली वाळू चोरी महसूल पोलीस विभागाच्या अधिकारी कर्मचाऱ्यांना दिसत नसल्याने याचीही जोरदार चर्चा रंगली असून घरकुलासाठी मोफत वाळू वाटणाऱ्यावर धाड टाकून त्याचे साहित्य जप्त करणारे सहाय्यक जिल्हाधिकारी जेनीत चंद्रा दोन्तूला हे शासकीय कामात व्यस्त असल्याचा फायदा वाळूतस्कर घेत असून या दोन्ही पेंढावरील वाळू तस्करांना का मूभा देण्यात आली असा सवाल ही खाजगीत वाळू तस्कर करत आहेत

• सांज दैनिक बीड • वास्तव

सायं. दैनिक बीड वास्तव हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक जितेंद्र कान्होजीराव सिरसाट** शुभेच्छा प्रिंटिंग प्रेस एमआयडिसी. बीड -४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून बीड वास्तव ऑफिस बशीर गंज चौक, बीड ४३११२२ (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. **संपादक - जितेंद्र कान्होजीराव सिरसाट, निवासी संपादक -अरविंद ओव्हाळ** (या अंकामध्ये छापलेल्या मजकूराशी मालक संपादक प्रकाशक सहमत असतीलच असे नाही) (वाद-विवाद बीड न्याय कक्षेत) मो. 9022952922

## विशेष

### सुविचार

उद्योग हेच माणसाचे लक्षण आहे.

– संस्कृत सुभाषित

मित्रं वा बन्धुं वा वैवातिप्रणयपीडितं कुर्यात । स्वम वत्समतिपिबन्तं विषाण कोट्याक्षिपति धेनु : ।।

अर्थ : मित्राच्या किंवा आप्ताच्या प्रेमाचा ार ायदा घेऊ नये. स्वत :चे वासरू जर जास्त दूध पिऊन त्रास देत असेल तर गाय स्वत : त्यालाही शिंगानी ढोसून दूर करते.

### गुरु वचन

# पंचायतीचा निर्णय

एकदा एक हंस आणि हंसिणी हरिद्वारच्या सुरम्य वातावरणातून भटकत उजाड, निर्जन आणि वाळवंटात आले.

हंसिणी हंसाला म्हणाली की, आपण कोणत्या भागात आलो आहोत? इथे तर पाणी नाही, जंगल आणि थंड हवादेखील नाही. इथे तर आपले जगणे कठीण होईल. भटकताना सायंकाळ झाली तेव्हा हंसाने हंसिणीला म्हटले की, आजची रात्र कशी तरी घालवू या. आपण सकाळी हरिद्वारला परतू या!

रात्र झाली तेव्हा झाडाखाली हंस आणि हंसिणी थांबले होते त्या झाडावर एक घुबड बसले होते. ते जोराने ओरडू लागले.

हंसिणीने हंसाला विचारले अरे इथे तर रात्री झोपू शकत नाही. हे घुबड ओरडत आहे. हंसाने पुन्हा हंसिणीची समजूत काढली की, कशी तरी रात्र घालवू या. आता मला कळले की हा प्रदेश ओसाड आहे. असे घुबड ज्या भागात राहतील तो तर विराण आणि ओसाड राहीलच. झाडावर बसलेले घुबड दोघांचे बोलणे ऐकत होते. सकाळ झाली तेव्हा घुबड खाली आले आणि त्याने म्हटले की, हंसभाऊ माझ्यामुळे रात्री तुम्हाला खूप त्रास झाला मला माफ कर. हंस म्हणाला, काही हरकत नाही, तुझे आभार!

असे म्हणून हंस आपल्या हंसिणीला घेऊन जसाच पुढे निघाला तेव्हा मागून घुबड ओरडले, अरे हंसा माझ्या पत्नीला घेऊन कुठे चाललास? हंस चपापला त्याने म्हटले तुझी पत्नी? अरे, ही हंसिणी आहे, माझी पत्नी आहे. माझ्यासोबत आली होती, माझ्यासोबत जात आहे.

घुबड म्हणाले, चूप बस, ही माझी पत्नी आहे. दोघांचा वाद वाढला. सर्व लोक गोळा झाले. अनेक गावातील जनता बसली. पंचायत बोलावण्यात आली. पंच लोकही आले. त्यांनी विचारले, कशाचा वाद आहे? लोकांनी सांगितले घुबडाचे म्हणणे आहे की, हंसिणी त्याची पत्नी आहे आणि हंस म्हणतोय हंसिणी त्याची पत्नी आहे!

दीर्घ बैठक आणि पंचायतीनंतर पंच बाजूला झाले आणि म्हणाले की, हंसिणी हंसाची पत्नी आहे, ही गोष्ट खरी आहे. मात्र हंस आणि हंसिणी तर आता थोड्यावेळात या गावातून निघून जातील. आमच्यात तर फक्त घुबडच राहील.

## घुबडाने त्याला हाक मारली

त्यामुळे निर्णय घुबडाच्या बाजूनेच द्यायचा आहे. मग पंचांनी आपला ैसला सुनावला आणि म्हटले की, सर्व तथ्य आणि पुरावे तपासल्यानंतर ही पंचायत या निष्कर्षावर येते की, हंसिणीची घुबडाची पत्नी आहे आणि हंसाला ताबडतोब गाव सोडून जाण्याचा आदेश देते.

हे ऐकताच हंस हैराण झाला आणि रडू लागला. पंचायतने चुकीचा निर्णय दिला असे ओरडू लागला. घुबडाने माझी पत्नी घेतली! रडत ओरडत तो निघाला तेव्हा घुबडाने त्याला हाक मारली. ऐ मित्र हंस, थांब! हंसाने रडतच विचारले बाबा आता आणखी काय करणार आहेस? पत्नी तर तू घेतलीच आहेतस.

## आता काय जीव घेणार?

घुबड म्हणाले, नाही मित्रा, ही हंसिणी तुझी पत्नी होती आणि आहे! मात्र काल रात्री जेव्हा मी ओरडत होतो तेव्हा तू तुझ्या पत्नीला म्हणाला होतास की, हा प्रदेश विराण आणि ओसाड आहे कारण इथे घुबड राहतो! मित्रा, हा प्रदेश विराण आणि ओसाड तो इथे घुबड राहता म्हणून नाही तर, इथे असे पंच राहतात जे घुबडाच्या बाजूने निर्णय देतात.

स्वातंत्र्याच्या एवढ्या वर्षानंतरही आपल्या देशाच्या दुर्दशेचे मूळ कारण बहुधा हेच आहे की, आपण आपला निर्णय घुबडांच्या बाजूने सुनावला आहे. त्याला आपणच जबाबदार आहोत.

# लिंबागणेश येथील श्रीक्षेत्र भालचंद्र गणपती मंदिरात गणेश जयंती निमित्त धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन







➤ **बीड : प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील बालाघाटावरील ऐतिहासिक व धार्मिक महत्त्व लाभलेल्या लिंबागणेश येथील श्रीक्षेत्र भालचंद्र गणपती देवस्थानच्या वतीने गणेश जयंती निमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमांतर्गत श्रीमत गणेश महापुराण कथा तसेच पंचकुंडी गणेश यज्ञ यास दि. १६ जानेवारी शुक्रवारपासून विधिवत प्रारंभ झाला असून परिसरात भक्तिभाव व अध्यात्मिक वातावरण निर्माण झाले आहे. देवस्थान समितीच्या वतीने दरवर्षी गणेश जयंतीनिमित्त धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते.

आज दि. २२ गुरुवार रोजी सकाळी मन्मथ स्वामी संस्थानचे मठाधिपती व सुप्रसिद्ध प्रवचनकार डॉ. विरुपाक्ष शिवाचार्य महाराज यांच्या शुभहस्ते भाविक भक्तांच्या उपस्थितीत गणेश जयंती साजरी करण्यात आली. यावेळी महाराजांनी श्री गणेश जन्मकथेचे सविस्तर वर्णन करून प्रवचनातून भक्तांना अध्यात्मिक मार्गदर्शन केले.

या धार्मिक सोहळ्याची सांगता उद्या दि. २३ शुक्रवार रोजी ह.भ.प. धर्मराज दादा सामनगावकर यांच्या सुश्राव्य व भावस्पर्शी कीर्तनाने होणार आहे. या कार्यक्रमाचा लाभ घेण्यासाठी भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन श्रीक्षेत्र भालचंद्र गणपती देवस्थान समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

# मराठी चित्रपटसृष्टीत हॉरर प्रेमकथेचा नवा अध्याय 'सहवास'!

## ➤ दिग्दर्शक शिवाजी दोलताडे आणि निर्माते गोवर्धन दोलताडे यांच्या 'सहवास' चित्रपटाचे दमदार पोस्टर प्रकाशित

**शिरूर : प्रतिनिधी**

मराठी चित्रपटसृष्टीत हॉरर आणि प्रेमकथेचा अनोखा संगम सादर करणारा नवा चित्रपट "सहवास" याचे पहिले पोस्टर नुकतेच प्रदर्शित करण्यात आले आहे, सोनाई फिल्म क्रिएशन निर्मित या चित्रपटाने पोस्टरच्या माध्यमातूनच प्रेक्षकांच्या मनात कुतूहल आणि थरार निर्माण केला आहे. स्मार्ट सुनबाई हाऊसफुल झाल्यानंतर दिग्दर्शक शिवाजी दोलताडे यांनी पोस्टरमध्ये एका पुरुषाच्या खांद्यावर ठेवलेला अदृश्य हात आणि गूढ, अंधुक वातावरण चित्रपटाच्या कथेतील रहस्य अधोरेखित करते.

### भयावह सहवासाची कथा

"प्रेम का भीती?" हा सवाल उपस्थित करत, "सहवास" ही केवळ प्रेमकथा नसून, प्रेमाच्या नावाखाली उलगडणाऱ्या भयावह सहवासाची कथा असल्याचे संकेत पोस्टरमधून मिळतात.


### प्रेक्षकांसाठी वेगळा अनुभव ठरणार

"सहवास" या चित्रपटाचे दिग्दर्शन शिवाजी दोलताडे हे करणार असून, निर्मितीची धुरा गोवर्धन दोलताडे हे सांभाळणार आहेत. सहनिर्माते म्हणून कार्तिक दोलताडे पाटील यांचे योगदान आहे. मराठी सिनेमात फारसा न पाहिलेल्या हॉरर–रोमँटिक शैलीत हा चित्रपट प्रेक्षकांसाठी वेगळा अनुभव ठरणार आहे.

चित्रपटाच्या शीर्षकातील "सहवास" हा शब्द प्रेम, जवळीक आणि नातेसंबंध सूचित करतो, मात्र पोस्टरमधील भयगूढ संकेत या सहवासामागील अंधार उघड करतात. त्यामुळे हा सहवास प्रेमाचा आहे की भीतीचा, हे जाणून घेण्याची उत्सुकता प्रेक्षकांमध्ये निर्माण झाली आहे.


### "सहवास" प्रेम का भीती?

हा प्रश्न प्रेक्षकांच्या मनात घोळवत, चित्रपट २०२६ मध्ये प्रदर्शित होणार असल्याचे निर्मात्यांनी जाहीर केले आहे. या चित्रपटात अनेक दिग्गज कलाकार असणार आहेत असं दिग्दर्शक शिवाजी दोलताडे यांनी सांगितले आहे.




# प्रख्यात लेखक रवी दलाल यांना फरिदाबाद युनिव्हर्सिटी कडुन मानद डॉक्टरेट पदवी बहाल

➤ **अमरावती : प्रतिनिधी**



प्रख्यात साहित्यिक रवी दलाल याचं साहित्य हरियाणा फरिदाबाद युनिव्हर्सिटी मध्ये पोहचले जवाहरलाल नेहरू युनिव्हर्सिटी दिल्ली गैलरीत गेले. फरिदाबाद युनिव्हर्सिटी मध्युन मानद डॉक्टरेट पदवी मिळवली पण गावातल्याच पंचशील यात्रेत अजुनही पोहचले नाही.


तिवसा गावातील प्रख्यात लेखक रवी दलाल यांनी 300 वर्षा पासून अलिखित असलेले अवधुती भजन प्रथम 1993 साली लिहून काढले अठराव्या शतकापासून बौध्द शाखेच्या सांगायान पंरपरेतुन निर्माण झालेलं अलिखित अवधुती भजन लेखी करण्याचा मान रवी दलाल यांनी वयाच्या 22 व्या वर्षी मिळविला. अवधूती भजन बौद्ध धर्मातील प्रवाह रवी दलाल यांचा अंत्यंत वादग्रस्त समिक्षासंग्रह. या पुस्तकाचे एकुण चार भाग प्रकाशित झाले असून पारंपरिक पद्धतीने अवधूती भजन करणार्या भक्तानी रवी दलाल यांच्या समिक्षा संग्रहाला जोरदार विरोध केला होता. अनेक ढिकाणी पुस्तके फाडण्यात आली विदर्भातील सावंगा चिरोडी यात्रेत अवधूती भजनाचे पुस्तके जप्त करून रवी दलाल यांना पोलिसांनी निगराणी खाली ठेवले होते तिसऱ्या खंडातील वादग्रस्त लिखाणामुळे पोलिस स्टेशन मध्ये केस दाखल करण्यात आली होती. तीन वर्षांच्या लढाई नंतर पुस्तक विक्रीस मुभा मिळाली. रवी दलाल यांचे अवधूती भजनाचे चार खंड दोन पिढ्यानी वाचुन काढले आहे. अवधुती भजन लिहून धार्मिक चौकट तोडल्याने तेव्हाचे नामांकित लेखक प्रस्तावना दयायला तयार नव्हते. अशोक ढोले कवी ईबाहिम खान यांनी मात्र प्रस्तावना लिहिण्याची तयारी दर्शवली. शेवटी ईबाहिम खान यांनी अवधूती भजन बौद्ध धर्मातील प्रवाह या पहिल्या खंडालाप्रस्तावना दिली. प्रंचड वादग्रस्त ठरलेल्या पुस्तकाला आज 30 वर्षाचा कालावधी लोटला आहे. आतापर्यंत चार ही खंडाच्या हिंदी/मराठी आवृत्त्या प्रकाशित झाल्या असून महाराष्ट्रात अनेक वाचकांन पर्यंत पोहचल्या

या पुस्तका नंतर रवी दलाल यांनी लिखाणाची गती वाढवीली समिक्षासंग्रह कथासंग्रह, कवितासंग्रह, कथा, लघुकथा, कांदबरया प्रकाशित झाल्या आणि

रवी दलाल महाराष्ट्रातील प्रख्यात लेखक म्हणून पुढे आले-- 2025 मध्ये दिल्लीमधे दंगल कथेला आंतरराष्ट्रीय रॉक्स पुरस्कार मिळाला आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकर फेलोसिफ मिळाली असुन मराठी साहित्य अकादमी फेलोसिफ पुरस्कार मिळाला आता पर्यंत मोठ मोठ्या पुरस्काराने रवी दलाल यांना सन्मानित करण्यात आले. बहुचर्चित बेगळ कांदबरीवर राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठातुन प्रा छाया बोरकर PHd करित आहे. दिल्ली येथे मिळणारा राज्य शासनाचा समाजरत्न पुरस्कार रवी दलाल यांनी स्पष्ट नाकारला होता दि १/फेब्रुवारी/२०२६ तिसऱ्या अखिल भारतीय जिजाऊ मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद रवी दलाल यांना मिळाले आहे

अवधुती भजन बौद्ध धर्मातील प्रवाह या पुस्तकावर रवी दलाल यांना तब्बल 30 वर्षा नंतर साहित्य क्षेत्रांतील सेवेकरिता फरिदाबाद आर्ट युनिव्हर्सिटी हरियाणा तर्फे 14 मार्च 2026 रोजी. दिल्ली येथे डॉक्टरेट पदवी बहाल केल्या जाणार आहे. रवि दलाल यांचे साहित्य क्षेत्रातील प्रा. अजय खडसे, प्रविण कांबळे, विद्रोही अविनाश गोंडाणे, दिलिप शापामोहन, विशाल मोहोड, रमेश राऊत, गौरव राऊत, प्रा. पदमाकर

# महा जम्बो शब्दकोडे



### आडवी विधाने

१. देव आनंद, साधना यांचा सुपरहिट चित्रपट
५. मेलेला, ठार
७. मेळ, जुळणी
९. नोकर, सेवक
१०. गळ्यामागील भाग, सत्कार
११. एक हजार किलोचे वजन
१२. राजेश खन्ना, रेखा, राज बब्बर यांचा चित्रपट
१६. शशी कपूर, आशा पारेख यांचा चित्रपट
१८. पोपट, कीर, राघू
२०. सहा धावांचा क्रिकेटमधील फटका
२२. कुबेराचा सेवक
२३. वजनदार
२४. कापरे, थरथर
२५. भारलेला, ताब्यात आलेला
२७. दुर्दशा, वाईट अवस्था
२८. संजय दत्तची प्रभावी भूमिका असलेला चित्रपट
२९. मूषक
३०. किल्ल्याभोवतीची मजबूत भिंत
३१. दानशूर, मोठ्या मनाचा
३३. लाकूड कापण्याचे हत्यार
३५. नूतन, नवा
३६. तलवार
३८. कर, हस्त
४१. अभिप्राय
४३. अंगावरील बारीक मऊ केस
४५. खानेसुमारी, शिरगणती
४६. अज, बकरा
४८. शेंगेचे कवच
५०. धरित्री, पृथ्वी
५२. एका पक्ष्याचे नाव
५४. बाण, शर
५५. नाडी, शीर, धमनी
५७. अजगर
५८. पर्वत; जिन्नस
५९. इटलीची राजधानी
६१. सौभाग्यवतीचे संक्षिप्त रूप
६२. मंडप
६३. वडीलभाऊ; विनोद मेहराचा चित्रपट
६४. कोषाध्यक्ष
६७. दुःख, वेदना
६८. झाड, वृक्ष
६९. बकऱ्याचे कमावलेले कातडे
७१. युद्ध, रण
७३. दोरी, दोर
७५. सफेद, पांढरा
७७. जमिनीवर अंथरण्याचे जाडजूड बिछाईत
८०. लोणी
८१. अवहेलना, मानखंडना
८२. धर्मेंद्र-जीतेंद्र जोडीचा हिट चित्रपट

### उभी विधाने

१. उत्तर कुमार, शर्मिला टागोर यांचा चित्रपट
२. वर्ष, साल
३. नाटक-सिनेमात काम करणारा पुरुष
४. सोने, सुवर्ण
५. हरिणाच्या डोळ्यांसारखे डोळे असलेली सुंदर स्त्री
६. होडी, मचवा, नाव
७. मोर्चेबांधणी, एकत्र करणे
८. प्रतिबंध, बंदी (हिंदी)
९. 'शुक्रतारा' हा कार्यक्रम सादर करणारे गायक - अरुण **
१२. अभिनय, नट्टाफट्टा
१३. पक्ष्याच्या डोक्यावरील शेंडी
१४. यज्ञ, यजन
१५. गगन, नभ
१७. योग्य निर्णय, निवाडा
१९. मडक्याचा तुकडा
२१. ताजा, प्रफुल्लित
२४. फाणस, लालटेन
२६. नाराज, निराश
२८. कळलाव्या; ब्रह्मदेवाचा मानसपुत्र
३०. शरीर - अंतःकरण-पैसा इत्यादी सर्वस्व
३२. फाशांवरून शकुन पाहण्याची विद्या
३४. तृष्णा
३७. अंत, अखेर, समाप्ती
३९. धट्टाकट्टा, मजबूत, बळकट
४०. श्वापद, पशू
४२. तोटा, हानी
४४. राजेश खन्ना, शर्मिला टागोर, फिरोज खान यांचा चित्रपट
४७. भीती, भय
४९. एक हिंदी अभिनेत्री - **
अग्निहोत्री
५१. गायन म्हणण्याची विशिष्ट धाटणी, शैली
५३. भारताच्या पहिल्या महिला राज्यपाल - **** नायडू
५६. परस्परांपासून सारख्या अंतरावर असलेला
५७. आमंत्रण, बोलावणे
६०. अंतःकरण
६५. नोकर, सेवक
६६. अरबी वर्षाचा नववा महिना
६९. नेत्र, डोळे
७०. आर्थिक सामर्थ्य
७२. धुळीचा कण, रेणू
७४. मुस्लिमांचा नमस्कार
७५. पती, मालक, कारभारी
७६. कढवलेले लोणी
७८. मकरंद
७९. पराक्रमी, लढवय्या

### महा जम्बो शब्दकोडे कालचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| व | सं | त | का | ने | ट | क | र | | धु | | टो | क | दा | र |
| सा | ग | र | | म | | स | ई | प | रां | ज | पे | | दा | स |
| | न | | द | | वा | र | स | | डे | रा | | लू | | वं |
| अ | म | री | श | पु | री | | | म | | सं | क | ट | | ती |
| ना | त | | र | त | | चौ | क | शी | | ध | | मा | घ | |
| थ | | र | थ | | मा | का | | द | र | | खा | र | | क |
| | मो | द | | क | ल | र | व | | वा | ट | प | | त | म |
| मे | ह | न | त | | व | | जी | व | न | | र | ख | वा | ला |
| ह | र | | | क | ण | ख | र | | गी | त | | रू | | |
| बू | | स | व | ड | | प | | उ | | ग | र | ज | वं | त |
| ब | र | खा | स्त | | रा | | उ | दा | ह | र | ण | | श | र |
| | त्न | | रा | ज | धा | नी | | स | ल | | जी | व | | बे |
| न | मा | ज | | न्म | | ल | ग्न | | का | | त | र | बे | ज |
| क | ला | का | र | | ना | म | | भी | | अ | | पा | | |
| ली | | त | ग | म | ग | | स | म | ज | दा | र | | शो | ध |

# विद्यार्थ्यांमध्ये संवाद कौशल्य व आत्मविश्वास वाढविण्यासाठी फ्लाईंग बर्ड्स अकॅडमीचा अभिनव उपक्रम

## यशस्वी व्यक्तींच्या थेट मुलाखतीतून विद्यार्थ्यांना मिळाले मार्गदर्शन व प्रेरणा

**अरविंद ओव्हाळ : प्रतिनिधी**

शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांमध्ये संवाद कौशल्य वृद्धिंगत व्हावे, तसेच मोठ्या व यशस्वी व्यक्तींशी संवाद साधण्याचे धाडस निर्माण व्हावे, या उद्देशाने फ्लाईंग बर्ड्स अकॅडमीच्या वतीने मागील आठवडाभर शहरातील विविध यशस्वी उद्योजक व व्यावसायिकांच्या थेट मुलाखती घेण्याची अभिनव मोहीम राबविण्यात आली होती.

या उपक्रमांतर्गत आज फ्लाईंग बर्ड्स अकॅडमीच्या विद्यार्थ्यांनी शहरातील सुंदरराव सोळंके महाविद्यालयाचे उप-प्राचार्य मा. डॉ. एम. व्ही. कव्हाळे यांची थेट मुलाखत घेतली. ही मुलाखत विद्यार्थ्यांसाठी अत्यंत प्रेरणादायी, मार्गदर्शक आणि भविष्यास दिशा देणारी ठरली.

मुलाखतीदरम्यान डॉ. कव्हाळे यांनी आपल्या शैक्षणिक प्रवासाचा आढावा घेत सातत्य, शिस्त आणि सकारात्मक दृष्टिकोन या यशाच्या तीन प्रमुख किल्ल्या असल्याचे स्पष्ट केले. विद्यार्थ्यांनी विचारलेल्या विविध प्रश्नांना त्यांनी अत्यंत समर्पक, सखोल आणि अनुभवाधारित उत्तरे दिली.

विद्यार्थ्यांनी अभ्यासाबरोबरच व्यक्तिमत्त्व विकास, कौशल्यवृद्धी, स्पर्धा परीक्षा आणि समाजाभिमुख उपक्रमांचे महत्त्व याबाबत प्रश्न विचारले. त्यावर उत्तर देताना डॉ. कव्हाळे यांनी विद्यार्थ्यांनी वेळेचे योग्य नियोजन करावे, नियमित वाचनाची सवय लावावी आणि स्वत:वर ठाम विश्वास ठेवावा, असा मौल्यवान सल्ला दिला. या संपूर्ण उपक्रमासाठी संस्थेचे अध्यक्ष पांडुरंग चांडक, मुख्याध्यापिका सारिका बजाज आणि उपमुख्याध्यापक सचिन गायकवाड यांनी विशेष परिश्रम घेतले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राबविण्यात आलेला हा उपक्रम पालक व शिक्षणप्रेमींमध्येही विशेष कौतुकाचा विषय ठरला आहे.





**ठळक मुद्दे**

- विद्यार्थ्यांमध्ये संवाद कौशल्य व आत्मविश्वास वाढविण्याचा उद्देश
- यशस्वी व्यक्तींच्या थेट मुलाखतींची अभिनव संकल्पना
- सुंदरराव सोळंके महाविद्यालयाचे उप-प्राचार्य डॉ. एम. व्ही. कव्हाळे यांची प्रेरणादायी मुलाखत
- सातत्य, शिस्त आणि सकारात्मकतेवर भर
- वेळेचे नियोजन, वाचन व आत्मविश्वासाचा संदेश



# शासनाच्या योजना थेट जनतेपर्यंत पोहोचवण्यासाठी युवराज बोरसे यांची उमेदवारी

**कन्नड : प्रतीनिधी**

कन्नड तालुक्यातील चापानेर गणातून पंचायत समिती निवडणूक लढविण्यासाठी शेतकरी पुत्र युवराज बोरसे यांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. विकास महर्षी रायभान जाधव विकास आघाडीच्या वतीने युवराज बोरसे निवडणूक रिंगणात उतरल्याने संपूर्ण चापानेर गणात सकारात्मक वातावरण निर्माण झाले असून, नागरिकांकडून त्यांना उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

ग्रामीण भागातील समस्या जवळून अनुभवलेल्या युवराज बोरसे यांनी जनतेच्या मूलभूत गरजांना प्राधान्य देत निवडणूक लढविण्याचा निर्णय घेतला आहे. चापानेर गणातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न आजही ज्वलंत असून, अनेक वर्षांपासून तो प्रलंबित आहे. वेळेवर व स्वच्छ पाणी उपलब्ध नसल्यामुळे नागरिकांना पाणी विकत घ्यावे लागत असून, महागाईच्या काळात हा आर्थिक भार सामान्य कुटुंबांसाठी परवडणारा नाही. हा प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लावण्यासाठी ठोस उपाययोजना करण्यात येतील, असा निर्धार युवराज बोरसे यांनी व्यक्त केला आहे.

यासोबतच ग्रामीण भागातील नागरिकांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ वेळेवर आणि थेट मिळावा, यासाठी पंचायत समितीच्या माध्यमातून प्रभावी पाठपुरावा केला जाईल. शेतकरी, महिला, युवक, विद्यार्थी तसेच गरजू घटकांसाठी असलेल्या शासकीय योजना कागदोपत्री न राहता प्रत्यक्ष लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याचा संकल्प त्यांनी जाहीर केला आहे.

शिक्षणाच्या क्षेत्रात जिल्हा परिषदेच्या शाळा अधिक सक्षम करून, सर्व आवश्यक सोयी-सुविधा, दर्जेदार शिक्षण व आधुनिक सुविधा उपलब्ध करून दिल्या जातील, जेणेकरून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना खाजगी शाळांकडे वळावे लागू नये, असेही त्यांनी सांगितले. युवराज बोरसे यांच्या उमेदवारीला चापानेर गणातील शेतकरी, युवक, व्यावसायिक तसेच विविध सामाजिक संस्था व मित्रमंडळांकडून मोठा पाठिंबा मिळत असून, सर्वांनी एकत्र येत त्यांच्या प्रचाराला सक्रिय सहकार्य करण्याचे आश्वासन दिले आहे. विकास, पाणी, शिक्षण आणि शासन योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीच्या मुद्द्यांवर युवराज बोरसे यांनी निवडणूक रिंगणात उतरल्याने चापानेर गणात परिवर्तनाची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.



# शेकटा येथे किशोर चव्हाण यांच्या वाढदिवसानिमित्त क्रिकेट स्पर्धेचे आयोजन

**लासूर स्टेशन : प्रतिनिधी**

येथून जवळच असलेल्या शेकटा येथे एक गाव एक संघ टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. खा. लोकनेते संदीपान भुमरे मित्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष किशोर चव्हाण यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित करण्यात आलेली ही स्पर्धा सोमवार दि 19 रोजी पासून सुरू झाली आहे.



स्पर्धेचे उद्घाटन ह भ प कडूबाळ महाराज गवादे यांच्या हस्ते संपन्न झाले यावेळी शिवसेनेचे जिल्हा समन्वयक बाळासाहेब चव्हाण, किशोर चव्हाण, अल्पसंख्याक जिल्हाप्रमुख बादशहा पटेल, सुनील पोळ, महेंद्र गंडे यांच्यासह शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.

स्पर्धा विजयी संघास प्रथम पारितोषिक एक्कावन्न हजार, द्वितीय एकतीस हजार, तृतीय अकरा हजार, पाच हजार शंभर रुपयांचे चौथे पारितोषिक असणार आहे. स्पर्धा यशस्वीतेसाठी नारायण राजपूत अवैज शेख तसेच किशोर चव्हाण मित्र मंडळ परिश्रम घेत आहे.

# माजलगावात हेल्मेट सक्तीची कडक अंमलबजावणी; अपघाती मृत्यू रोखण्यासाठी शहर पोलिसांचा पुढाकार

## दुचाकीस्वारांनी हेल्मेट वापरून जीव वाचवावा; अन्यथा कारवाई - पो.नि. राहुल सूर्यतळ यांचे आवाहन

**माजलगाव : प्रतिनिधी**

दिवसेंदिवस दुचाकी अपघातांचे प्रमाण वाढत असून, त्यामध्ये अनेकांना आपला जीव गमवावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर शासनाने दुचाकीस्वारांसाठी हेल्मेट वापरणे सक्तीचे केले असून, या आदेशाची माजलगाव शहर पोलीस स्टेशनकडून काटेकोर अंमलबजावणी करण्यात येत आहे.

दुचाकी अपघातांमध्ये डोक्याला गंभीर दुखापत होऊन मृत्यू होण्याचे प्रमाण अधिक असल्याने, हे प्रमाण कमी करण्यासाठी हेल्मेट वापरणे अत्यावश्यक आहे. यासाठी माजलगाव शहर पोलिसांच्या वतीने शहरात विशेष मोहिम राबवण्यात येत असून, हेल्मेट न वापरणाऱ्या वाहनधारकांवर दंडात्मक कारवाई केली जात आहे. याबाबत बोलताना शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक राहुल सूर्यतळ यांनी दुचाकी वाहनधारकांना आवाहन केले की, "घरातून बाहेर पडताना जसे मोबाईल, गॉगल किंवा इतर आवश्यक साहित्य सोबत घेतले जाते, त्याचप्रमाणे हेल्मेट ही देखील सवय बनवा. हेल्मेट वापरून स्वत:चा जीव वाचवा आणि अनावश्यक दंड टाळा." ही संपूर्ण कारवाई पोलीस निरीक्षक राहुल सूर्यतळ यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार एस. एस. शिंदे, महादेव कोकणर, अनिल कानडे, राहुल गोरे, अंजूम मॅडम आदी पोलीस कर्मचारी प्रभावीपणे पार पाडत आहेत.



**ठळक मुद्दे**

- दुचाकी अपघातातील मृत्यूचे प्रमाण वाढल्याने शासनाची हेल्मेट सक्ती
- माजलगाव शहर पोलिसांकडून नियमांची प्रभावी अंमलबजावणी
- हेल्मेट न वापरणाऱ्या वाहनधारकांवर कारवाई
- "हेल्मेट ही सवय ठेवा, जीव वाचवा" – पोलीस निरीक्षकांचे आवाहन

# मोठेवाडीत मोफत नेत्र तपासणी शिबीर संपन्न




## २१५ रुग्णाची झाली तपासणी

**माजलगाव : प्रतिनिधी**

तालुक्यातील मोठेवाडी येथे आय. डी. एफ. सी. बँक व मुंदडा नेत्र रूग्णालय संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २१ जानेवारी बुधवार रोजी मोफत नेत्र तपासणी शिबीर घेण्यात आले. या शिबिरात डॉ. योगेश बादले, डॉ. धनंजय शिंदे यांनी २१५ महिला व पुरूष रूग्णांची मोफत नेत्र तपासणी केली. हे शिबीर यशस्वी होण्यासाठी आय. डी. एफ. सी. बँकेचे शरद देढे, गणेश वराडे गावातील वसंत पास्टे, जयराम रासवे, दिपक पास्टे, माऊली वराडे, सुनील खटले, सचिन रोकडे यांच्या सह ग्रामस्थांनी परिश्रम घेतले.

# "साधना पाटील विद्यालयात सामाजिक बांधिलकीचा आदर्श"

**कन्नड :** मकरसंक्रांतीच्या पवित्र सणाचे औचित्य साधत तसेच स्व. साधना टीला पाटील यांच्या चौदाव्या पुण्यस्मरणानिमित्त शहरातील साने गुरुजी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित साधना पाटील प्राथमिक विद्यालय, साने गुरुजी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय व डॉ. टी. एस. पाटील इंग्लिश स्कूल, नरसिंगपूर येथे महिला सन्मानदिन व हळदी-कुंकू कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

शाळेचे मुख्याध्यापक नरेंद्र पवार यांच्या संकल्पनेतून आयोजित या कार्यक्रमाला संस्थेचे अध्यक्ष डॉ. मिलिंद पाटील अध्यक्षस्थानी होते. तर संस्थेचे सचिव टी. एस. कदम, कन्नड नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा फरीन बेगम अब्दुल जावेद, माजी नगराध्यक्षा स्वातीताई कोल्हे, उपनगराध्यक्षा रंजनाताई राठोड, माजी उपसभापती डॉ. नयना तायडे, आरोग्य विभागाच्या सुवर्णा देशमुख, तालुका समूह संघटक स्वप्नाली वैष्णव यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांची प्रमुख उपस्थिती लाभली. ग्रामीण व शहरी भागातील महिलांनी पारंपरिक वेशभूषेत सहभागी होत गप्पागोष्टी, संगीत खुर्ची यांसारख्या मनोरंजनात्मक खेळांचा आनंद घेत मकरसंक्रांतीचा सण आनंदात साजरा केला. खेळांतील विजेत्या महिलांना मान्यवरांच्या हस्ते बक्षिसांचे वितरण करण्यात आले. तसेच उपस्थित सर्व महिलांना महिला शिक्षकांच्या हस्ते सौभाग्याचे वाण देण्यात आले. कार्यक्रमातून स्व. साधना आईंच्या सामाजिक, शैक्षणिक व महिलांसाठी असलेल्या आपुलकीच्या कार्याचा गौरव करण्यात आला. यावेळी महिलांच्या आरोग्य, शिक्षण व स्वावलंबनाबाबत मार्गदर्शन करत महिला सक्षमीकरणाचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. या उपक्रमामुळे परिसरातील महिलांना आनंदाचे क्षण लाभले असून, शाळेच्या सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी अथक परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अमोल घुगे यांनी केले तर मुख्याध्यापक नरेंद्र पवार यांनी आभार मानले.







# दुनगांव येथे बाल आनंद नगरी सोहळा मोठया उत्साहात साजरा

**पाचोड | अनिस पटेल**

दि. २१ जानेवारी २०२६ रोजी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा दुनगांव येथे बाल आनंद नगरी हा कार्यक्रम घेण्यात आला या कार्य क्रमाला शाळेतील विद्यार्थी, विद्यार्थिनी मोठया संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक श्री. बंडु बांगर सर होते. प्रमुख पाहुणे म्हणून केंद्रप्रमुख श्री. लक्ष्मण पांगरकर सर होते. मान्यवराच्या हस्ते क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. शाळेच्या वतीने मान्यवर पाहुण्यांचा शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष श्री मुजीब पटेल यांच्या हस्ते बाल आनंद मेळाव्याच्या फलकाची फीत कापून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले.

या कार्यक्रमा गावातील प्रतिष्ठित नागरिक श्री बबन मंडलिक उपसरपंच, बबन जायभाये, अशोक साबळे, जितेंद्र शेळके, प्रभाकर पाटोळे, दिनकर जायभाये, अफसर खान, संपत जायभाये श्री. पांडुरंग जायभाये, शेषेराव डेरे, भीमराव भिंगारे, पिंटू जायभाये, सुभाष जायभाये आदी मान्यवर उपस्थित होते. प्रास्ताविक श्री. चेतन गदळे सर यांनी मांडले. प्रास्तविकात सरांनी बाल आनंद मेळाव्याचे महत्त्व सर्वांना सांगितले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. सोनवणे सर यांनी केले तर मान्यवराचे आभार श्री. भवर सर यांनी मांडले. या कार्यक्रसाठी भिसे मॅडम, श्री. काकडे सर, गिराम मॅडम यांनी विशेष परिश्रम घेतले.

# माजलगावात श्री गणेश जयंती उत्साहात साजरी

## जुना मोंढा गणपती मंदिरात महाभिषेक व १०,०८० अथर्वशीर्ष आवर्तने







**माजलगाव : प्रतिनिधी**

श्री गणेश जयंती निमित्त परमपूज्य गुरुमाऊलींच्या पावन आशीर्वादाने माजलगाव शहरातील जुना मोंढा येथील श्री गणपती मंदिरात आज भक्तिभावाने गणेश जन्मोत्सव साजरा करण्यात आला. सकाळी ठिक ७ वाजता श्री गणेश जन्मोत्सव विधिवत पार पडला. याआधी पहाटे ५ वाजता नित्यपूजा, महाभिषेक व महाआरती संपन्न झाली.

यानंतर श्री स्वामी समर्थ सेवा, अध्यात्मिक विकास व बालसंस्कार केंद्र, दिंडोरी प्रणित माजलगाव येथील बालसंस्कार विभागाच्या वतीने ग्रामाभियानांतर्गत सामूहिक श्री गणपती अथर्वशीर्षाचे २१ जप तसेच एकूण १०,०८० आवर्तने भक्तांच्या सहभागातून करण्यात आली. यानंतर सर्व उपस्थित भक्तांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. या महाप्रसादाचे यजमान संजय शेजुळ व विष्णूपंत घाटुळ हे होते.

या प्रसंगी श्री गणपती मंदिर, जुना मोंढा माजलगाव येथील विश्वस्त विष्णुभाऊ मुंदडा, जगदीश चांडक, माधवराव आबा सोळंके, मन्मथ अप्पा लांडगे, भगवान लाटे, प्रदीप रुद्रवार, प्रकाश दुगड, संजय कोकड, जुगलकिशोर नावंदर, अजित भावठाणकर, रमेश चांडक, बाबासाहेब सरवदे, गणेश लोहिया, सुरेश बोराडे, रुपेश गडम, सुभाष रुद्रवार, दीपक शिनगारे, ओम भुतडा, रोहित नावंदर, दत्ता वाघमारे, प्रमोद मालाणी, शिवशंकर भंडारे यांच्यासह समस्त श्री स्वामी समर्थ सेवेकरी, गणेशभक्त महिला-पुरुष, नागरिक, पत्रकार, विद्यार्थी व शेकडो भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## नव्या पिढीला बाळासाहेबांच्या विचारांची गरज

## शिवसेना तालुकाप्रमुख उद्धव बापू मडके यांचा प्रेरणादायी उपक्रम

# बाळासाहेबांच्या विचारांची शिदोरी पुढच्या पिढीपर्यंत!

**गेवराई : प्रतिनिधी**

हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या १०० व्या शताब्दी जयंतीनिमित्त "बाळासाहेब ठाकरे विचार प्रबोधन स्पर्धा" 23 जानेवारी 2026 पासून आयोजित करण्यास आली आहे. ही स्पर्धा शिवसेना तालुकाप्रमुख उद्धव बापू मडके यांच्या पुढाकाराने व नेतृत्वाखाली आयोजित करण्यात येत आहे.



"बाळासाहेब शताब्दी सेवा सप्ताह" या उपक्रमांतर्गत तालुक्यातील सर्व जिल्हा परिषद प्राथमिक व माध्यमिक तसेच खाजगी (प्रायव्हेट) शाळांमध्ये ही स्पर्धा घेण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रभक्ती, समाज जाणीव, नेतृत्वगुण व प्रेरणादायी विचार रुजविण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येत आहे.

ही स्पर्धा पूर्णत: शैक्षणिक व सामाजिक हेतूने आयोजित करण्यात येणार असून कोणत्याही प्रकारचा राजकीय प्रचार नसणार असल्याचे शिवसेना तालुकाप्रमुख उद्धव बापू मडके यांनी स्पष्ट केले आहे. विद्यार्थ्यांच्या वैचारिक व बौद्धिक विकासासाठी हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे त्यांनी सांगितले.

या स्पर्धेसाठी पंचायत समिती गेवराईचे गटशिक्षणाधिकारी व संबंधित सर्व शाळांना लवकरच अधिकृत परिपत्रकाद्वारे सूचना देण्यात येणार आहेत. प्रशासनाच्या सकारात्मक प्रतिसादामुळे तालुक्यातील विद्यार्थ्यांना वैचारिक प्रबोधनाची मोठी संधी उपलब्ध होणार आहे.